**भूसंपादन प्रकरणांमध्ये मा.न्यायालयीन आदेशांचे काटेकोरपणे अनुपालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी (Accountability) निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन परिपत्रक क्र: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४१/भूसंपादन-०२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि.२२.०९.२०२६.

<u>वाचा</u> :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील प्रथम अपिल क्र.२१०९/२०२५ (महाराष्ट्र शासन विरुध्द जुबेदा फकीर महम्मद) मधील आदेश दि. १८.०८.२०२६.
२. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४१/भाग-१/अ-४, दि.०३.११.२०१६
३. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.२३४/भूसंपादन-०२, दि.१७.०७.२०२५
४. शासन पत्र क्र.न्यायप्र-२०२६/प्र.क्र.२४१/भूसंपादन-०२, दि.३१.०७.२०२६

**<u>प्रस्तावना :-</u>**

मा. उच्च न्यायालयाने भूसंपादनाशी निगडीत प्रथम अपिल क्र. २१०९/२०२५ व संलग्न प्रकरणांमध्ये वाढीव मोबदला देण्याबाबतचे आदेश पारित करुनही दिर्घकालावधीनंतर मोबदल्याची रक्कम जमा न केल्याबद्दल तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच भुसंपादन निवाड्यानुसार देय असलेला मोबदला निर्धारित कालावधीत अदा न केल्यास संबंधित अधिनियमातील वैधानिक तरतुदींनुसार राज्य शासनावर/भुसंपादन संस्थेवर व्याजाचे दायित्व निर्माण होते आणि सार्वजनिक निधीवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे निरिक्षणे नोंदविली आहेत.

मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार केवळ भूसंपादन कार्यपद्धती तसेच मोबदला वाटप प्रक्रियेचे नियम तयार करणे पुरेसे नसून त्यामधील विलंबाबाबतची थेट जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. मा. न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन झाल्यास व कोणत्याही सबळ कारणाशिवाय विलंबास कारणीभुत असणा-या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा तयार करण्याचेही निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्यानुसार सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/भुसंपादन अधिकारी/भूसंपादन संस्था आणि संबंधित प्रशासकीय विभाग यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

१. वाढीव मोबदला आदेश विचारात घेऊन अपिलाबाबत यथायोग्य निर्णय घेणे (कालावधी -१ महिना) :-
भुसंपादन निवाड्याप्रकरणी मा. न्यायालयाने वाढीव मोबदल्याच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशांचा विचार करता मा. वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करावयाचे आहे किंवा कसे, याबाबत शासनाचे स्थायी

आदेश आणि संबंधित सरकारी वकिलांचे अभिप्राय विचारात घेऊन अपिलाबाबत मा. न्यायालयीन आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत निर्णय अंतिम करण्यात यावा.

२. भूसंपादन वाढीव मोबदला जमा करण्याची कालमर्यादा ( कालावधी - १ महिना ) :-

भूसंपादन वाढीव मोबदला प्रकरणांमध्ये अपिल दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आल्यास अशा प्रकरणी संबंधित भुसंपादन अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित भुधारकास वाढीव मोबदला रक्कम अदा करण्यासाठी अशी मोबदला रक्कम प्रकरणपरत्वे मा. न्यायालयात किंवा भूसंपादन अधिकारी यांच्या स्वीय प्रपंची लेखामध्ये जमा करणे अनिवार्य राहिल.

३. भूसंपादन अधिकारी/भूसंपादन संस्थेच्या अधिका-यांचे उत्तरदायित्व/शिस्तभंगाविषयक कार्यवाही :-

मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार वाढीव मोबदल्याची रक्कम कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय विहित कालावधीत प्रकरणपरत्वे मा. न्यायालयामध्ये अथवा भूसंपादन अधिकारी यांच्या स्वीय प्रपंची लेखामध्ये जमा न झाल्यास, अशा अनियमिततेसाठी संबंधित भुसंपादन अधिकारी अथवा भुसंपादन संस्थेचे अधिकारी जबाबदार (Accountable) राहतील. तसेच अशा अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार तातडीने शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करण्यात यावी.

४. शासकीय निधीचे नुकसान व वसूली :-

भूसंपादन वाढीव मोबदल्याच्या रकमा अत्यंत विलंबाने जमा करण्यात येणे अथवा विलंबाने अदा करणे यामुळे विविध प्रकरणी व्याजाच्या रकमेची मागणी होत असल्याचे आणि काही प्रकरणांमध्ये अशी व्याजाची रक्कम ही मुळ मोबदला रकमेपेक्षाही जास्त होत असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर बाब विचारात घेता, भूसंपादन प्रकरणी कोणत्याही सबळ कारणाशिवाय द्यावे लागणारे विलंबासाठीचे व्याज, अतिप्रदान इत्यादींसाठी संबंधित भूसंपादन अधिकारी/भूसंपादन संस्थेचे अधिकारी शिस्तभंग विषयक कारवाईस/वसूलीस पात्र राहतील.

५. स्वतंत्र नोंदवही ठेवणे :-

ज्या प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने सशर्त आदेश मंजुर केले आहेत अश्या प्रकरणांमध्ये संबंधित जिल्हाधिकारी, भुसंपादन अधिकारी व भूसंपादन संस्था यांनी न्यायालयीन आदेशांतील अटी, विहित मुदत, जमा करावयाची रक्कम व व्याज यांची स्वतंत्र नोंदवही ठेवुन नियमित आढावा घ्यावा. तसेच निधिच्या उपलब्धतेअभावी कोणत्याही परिस्थितीत मोबदला देण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. वाढीव मोबदला प्रकरणांचा नियमित आढावा घेणे (दरमहा) :-

संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी व भूसंपादन संस्था यांनी भूसंपादन प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत दरमहा अशा प्रकरणांचा आढावा घ्यावा. सदर आढाव्यांमध्ये भूसंपादन कार्यवाही, विहित कालमर्यादा तसेच मा.न्यायालयाचे निर्देश तसेच उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय / शासन पत्रामधील सुचनांचे पालन

झाले नसल्याची बाब निदर्शनास आल्यास अशा भूसंपादन अधिकारी व भूसंपादन संस्थेचे अधिकाऱ्यांविरुद्ध जबाबदारी (Accountability) निश्चित करुन शिस्तभंग विषयक कारवाईचे प्रस्ताव त्या त्या सक्षम प्राधिकरणाकडे पुढील कारवाईसाठी तात्काळ सादर करावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०९२२१०५८१११६४८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN SITARAM METKARI

Digitally signed by MITHUN SITARAM METKARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=C5E8236705FDBCCA44E2729131D7F8ECF3D89986EF302C333A751DB3D8202DE1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F9CC4741E617C7D288990243652309A7CD19A13FD383DEF17B5669F6F383A116, cn=MITHUN SITARAM METKARI
Date: 2026.09.22 10:59:07 +05'30'

**(मिथुन मेटकरी)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई
१०) मा. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) मा. अपर मुख्य सचिव (जलसंपदा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व उपायुक्त भूसंपादन (कोकण,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,नागपूर,अमरावती)
१५) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मुंबई व नागपूर
१६) मुख्य अभियंता, मुंबई रेल्वे विकास प्राधिकरण, मुंबई
१७) मुख्य अभियंता, मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे मुंबई
१८) संचालक, नगर रचना, पुणे.
१९) सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
२०) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२१) व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
२२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
२३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई
२४) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई

२५) महानगर आयुक्त, पुणे/नाशिक/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/कोल्हापूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

२६) महाराष्ट्र विमानतळ विकास कॉर्पोरेशन लि. मुंबई

२७) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई

२८) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई

२९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

३०) मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

३१) महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित, मुंबई

३२) महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, मुंबई

३३) निवडनस्ती (भूसंपादन-२)